'साप्ताहिक शब्दरुतू'चे वार्षिक वर्गणीदार होण्यसाठी क्यूआर कोडवर वार्षिक किंवा मासिक योजनांचे पेमेंट करून मो. ९०११२०१४१४ या व्हाट्सॲप नंबरवर स्क्रिनशॉट व आपला पूर्ण पत्ता पाठवावा.
**वार्षिक वर्गणी : १८० । मासिक वर्गणी : १४**


# शब्दरुतू

पोस्टल परवाना नं. SRP/136/2023-2026
संपर्क : मो. ९०११२०१४१४
**कार्यकारी संपादक : सुमीत लांडे, मुंबई**
Email ID : shabdarutu@gmail.com

साप्ताहिक शब्दरुतूला वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा
शब्दांच्या स्पर्शाने भिंतींचे आकाश बनो...
शब्दालय प्रकाशन
**शब्दालय प्रकाशन**
महाराष्ट्र शासनाचा वि.पु. भागवत व इतर अनेक नामवंत पुरस्कारप्राप्त संस्था
**आपले ग्रंथालय/कॉलेज/शाळा/व्यक्तिगत पुस्तके मागवण्यासाठी आजच संपर्क करा : मो. ९०११२०१४१४**

✻ वर्ष ३ रे ✻ अंक ३ रा ✻ रविवार दि. १९ ऑक्टोबर २०२५ (Decl.Regd.No. SR/MAG/11/2021) RNI.NO.MAHMAR/2021/84232 पाने ४ ✻ किंमत ४ रु. साप्ताहिक (Weekly)

**नवी कोरी पुस्तकं**



नॉस्टॅल्जिया
: लेखकाचे नाव :
**श्रीनिवास बेलसरे**
किंमत रु. : ४५०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन**



अनाहिता
: लेखकाचे नाव :
**निमा बोडखे**
किंमत रु. : ३५०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन**

# 'राधाकृष्ण विखे पाटलांना सोडणार नाही'

## ओबीसींच्या मेळाव्यात छगन भुजबळांचा एल्गार



**बीड :** राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री तथा बडे ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी शनिवारी पुन्हा एकदा मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्यावर निशाणा साधत ओबीसींचा कोर्टात अन् राजकारणातही विजय होईल असा ठाम विश्वास व्यक्त केला. यावेळी त्यांनी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा अन्य एक ओबीसी नेते विजय वडेट्टीवार यांच्यावरही निशाणा साधला.

छगन भुजबळ यांची काल बीडमध्ये ओबीसी महाएल्गार सभा झाली. त्यात त्यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून मनोज जरांगे यांच्यावर सडकून टीका केली. त्यात त्यांनी त्यांचा उल्लेख दलिंदर पाटील असा केला. शनिवारी सकाळी पुन्हा एका मराठी वृत्तवाहिनीशी संवाद साधताना त्यांनी त्याचा पुनरुच्चार केला. तसेच आरक्षणाच्या लढ्यात ओबीसींचाच विजय होईल असा ठाम विश्वास व्यक्त केला.

ते म्हणाले, तो (जरांगे) मला सातत्याने येवल्याचा अलीबाबा आदी वेगवेगळे शब्द वापरतो. त्यामुळे मी सुद्धा थोडी गंमत केली. तो सारखा बोलत राहील, मग मी त्याचे ऐकतच राहू का? म्हणून मी त्यांना तसे म्हणालो. आरक्षणाच्या लढ्याचा शेवट हाच राहील की, ओबीसी व भटक्या विमुक्तांचा विजय होईल. हा विजय कोर्टात होईल. तो राजकारणातही होईल.

बीडमध्ये काही महिन्यांपूर्वी मोठी जाळपोळ झाली होती. तेव्हा काही निवडक लोकांची घरे जाळण्यात आली. मुस्लीम समाजाच्या लोकांनी मागच्या भिंतीवर चढून तेथील लोकांना वाचवले. अरे कारवाई तर तुझ्यावर (जरांगे) व्हायला हवी होती रे. ज्या पद्धतीने तू सांगतोस, जो आपल्या विरोधात जाईल त्यांना चोपून काढा, जे आपल्या विरोधात जातील त्यांचे सर्व उमेदवार पाडा, ते पाहता कारवाई तुझ्यावर झाली पाहिजे होती. तुम्ही मारामारीची भाषा करतात. आज आमच्या नाभिक समाजाच्या व इतर लहान-लहान समाजाच्या लोकाची तुम्ही डोकी फोडली.

नुकतेच तुमच्या लोकांनी आमच्या नवनाथ वाघमारेंची गाडी जाळली. लक्ष्मण हाके यांच्या कार्यकर्त्याला जबर मारहाण केली, तुम्ही हॉस्पिटलमध्ये बसून कायदा हातात घेता. तुम्हाला काय आजार झाला देवालाची माहिती. पण तेथून तुम्ही प्रक्षोभक विधाने करता, असे छगन भुजबळ म्हणाले. **(पान २ वर)**

# शिवाजी पार्कवर ठाकरे बंधू पुन्हा एकत्र!



**मुंबई** : आजची दिवाळी वेगळी आहे, विशेष आहे. मला खात्री आहे की, मराठी माणसांची एकजूट आणि त्या एकजूटीचा प्रकाश सर्वांच्या आयुष्यात आनंद घेऊन आल्याशिवाय राहणार नाही. असेच सर्वजण आनंदात राहा, प्रकाश घेत राहा सर्वांना आनंद देत राहा असे उद्धव ठाकरे म्हणाले. यावेळी उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्रातील जनतेला दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. गेल्या दोन ते तीन महिन्यात ठाकरे बंधू सातवेळा एकत्र आले आहेत. **(पान २ वर)**

## शिवाजीराव कर्डिले यांचे निधन

**नगर** : जिल्हा राजकारणातील एक अनुभवी, मुत्सद्दी आणि लोकाभिमुख नेतृत्व हरपले आहे. शिवाजीराव कर्डिले यांनी कोणत्याही पक्षाचा झेंडा हातात घेतला तरी त्यांचे नातं जनतेशी कधी तुटलं नाही. ते नेहमीच ग्रामस्थांच्या प्रश्नांसाठी तत्पर असत आणि समस्यांचे थेट निवारण करीत.

# पाकिस्तानच्या हल्ल्यात अफगाणिस्तानचे तीन क्रिकेटपटू ठार

**नवी दिल्ली** : पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्या सीमारेषेवर सुरु असलेल्या लष्करी संघर्ष आता प्रचंड चिघळला आहे. पाकिस्तानने शुक्रवारी अफगाणिस्तानच्या पक्तिका प्रांतामध्ये केलेल्या हवाई हल्ल्यात तीन क्रिकेटपटू ठार झाले. या घटनेमुळे संपूर्ण क्रिकेटविश्वात संतापाची लाट उसळली आहे. या घटनेनंतर अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाने एक महत्त्वाचा निर्णय घेतला. अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाने पाकिस्तान आणि श्रीलंका यांच्यासोबत होणाऱ्या टी-२० तिरंगी मालिकेतून माघार घेत असल्याचे जाहीर केले. ही मालिका नोव्हेंबर महिन्यात होणार होती. मात्र, अफगाणिस्तानने या स्पर्धेतून माघार घेत क्रिकेट आणि रक्तपात एकत्र नांदू शकत नाही, असा रोखठोक संदेश दिला आहे.

अफगाणिस्तानी क्रिकेट बोर्डाच्या या **(पान २ वर)**



दिवाळी २०२५ च्या
हार्दिक शुभेच्छा!



आशयसंपन्न लेख, कथा आणि कविता
यांची मेजवानी घेऊन आला आहे
**शब्दालय दिवाळी अंक २०२५**
वितरण/विक्रीसाठी उपलब्ध...

**विशेष लेख**
**कितीही पुढारलो, तरी आदिबंध आदिम संस्कृतीचेच!**
मुकुंद कुळे / ४
**संस्कृतींच्या प्रवाहांचे घाट**
अंजली चिपलकट्टी / २५
**म. सयाजीरावांचा मुदबकखाना - संस्कृतिसमन्वयाची प्रयोगशाळा**
चिन्मय दामले / ३८
**आदिवासी संस्कृती व आपण**
प्राची वैद्य-दुबळे /५१
**वारसा आणि प्रवाह**
नीरजा पटवर्धन / ७६
**नास्तिकता आणि बहुसांस्कृतिकता**
अभिजित देशपांडे / ८४
**संस्कृतिसंकर आणि भारतीय दृश्यकला**
मंगेश नारायणराव काळे / ९५
**नाळ या मातीतली तुटलेली नाही**
कामिल पारखे / ११३
**संस्कृती : स्थलांतराच्या नजरेतून**
निळू दामले / १३२
**महाराष्ट्रातल्या मुद्रणतंत्राचा उदय : संस्कृतिसंकर आणि महाराष्ट्राचं समाजकारण**
नीतीन रिंढे / १३८
**गाव, गोधडी आणि गांधी**
अभिधा निफाडे / १५६
**मंदिर-मशिदींचे शहर : मालेगाव**
विनोद गोरवाडकर / १७०

**कथा**
**अमरनाथची आई**
मूळ हिंदी कथा : जितेंद्र भाटिया
अनुवाद : जयप्रकाश सावंत / १५
**रुकार**
हिनाकौसर खान / ६०
**एकाकी**
निहार सप्रे / १४६
**जिवट दोरवा**
सुचिता घोरपडे / १६२

**ललित**
**वेडी माया वाया गेली!**
मधुकर धर्मापुरीकर / ९०
**दूर का राही**
प्रतिमा कुलकर्णी / १२४
**ठेविले अनंते राहू नये तैसेची**
उदय कुलकर्णी / १५२
**मनविसाव्याचा श्रावणझोका**
सरिता सोमाणी / १७८

**कविता / १८३ ते १९९**
कल्पना दुधाळ । सुचिता खल्लाळ । नीलकंठ कदम । मनीषा उगले । सारिका उबाळे । संजय कृष्णाजी पाटील । अरुण शेवते । नम्रता फलके । संजय पाटील । लता थोरात । हर्षदा सुंठणकर । भगवान निळे । प्रशांत असनारे । व्यंकटेश चौधरी । स्वप्निल चव्हाण । तुकाराम खिल्लारे । प्रमोदकुमार अणेराव.

शब्दालय **पुस्तकवारी**
पुस्तकांची वारी... आपल्या दारी...
दिवाळी अंक घरपोहोच मागविण्यासाठी खालील नंबरवर संपर्क करा...
**90 11 20 1414**

| अंकाचे नाव | किंमत रुपये |
|---|---|
| अनुभव | २५०/- |
| आश्लेषा | २५०/- |
| अनघा | ३००/- |
| अक्षरदान | ३००/- |
| अक्षर ✻ | ३५०/- |
| अहेर | २५०/- |
| आनंदघन | ३००/- |
| चंद्रकांत | ४००/- |
| चौफेर समाचार | ५००/- |
| दीपलक्ष्मी | ३६०/- |
| दीपावली | ३५०/- |
| अक्षरधारा | ३५०/- |
| गंधाली | ३६०/- |
| हंस | ४५०/- |
| कथाश्री | ४००/- |
| किस्त्रीम | ३००/- |
| शब्दगांधार | २५०/- |
| स्वरप्रतिभा | २५०/- |
| शब्द शिवार | ३००/- |
| व्यासपीठ | १५०/- |
| शब्दालय | ३५०/- |
| व्हाईट स्पेस | २००/- |
| चांगुलपणाची चळवळ | २००/- |
| अंतरंग | २००/- |
| आनंद तरंग | २५०/- |
| चतुरंग अन्वय | ३००/- |
| अक्षर भेट | १५०/- |
| पृथा | ३००/- |
| शब्दाई | ३००/- |
| निनाद | ३००/- |
| सारांश | २००/- |
| आवाज | ४५०/- |
| मार्मिक | १२०/- |
| दिवाळी आवाज | ३८०/- |
| धमाल धमाका | ३००/- |
| फिरकी | २००/- |
| हास्य धमाल | ३००/- |
| जत्रा | ३५०/- |
| मोहिनी | ४५०/- |
| महाराष्ट्राची जत्रा | ३००/- |
| प्रभात | २००/- |
| श्यामसुंदर | ३००/- |
| रविवारची ध. जत्रा | २५०/- |
| भन्नाट | १५०/- |
| गुंफन | २००/- |
| टिंगल टवाळी | २२०/- |
| विनोदी कथा | २२०/- |
| विनोद वल्ली | २२०/- |
| आला रे आला | २२०/- |
| हा . हा . हा | २५०/- |
| सुभाषित | २५०/- |
| सुहास्य जत्रा | ३००/- |
| हास्यानंद | २५०/- |

| | |
|---|---|
| कालनिर्णय✻ | ३००/- |
| ललीत | ३००/- |
| लोकमत दीपोत्सव✻ | ३९९/- |
| लोकसत्ता✻ | २००/- |
| लोकप्रभा✻ | ५०/- |
| मेनका | ३५०/- |
| मौज | ४००/- |
| महाराष्ट्र टाईम्स✻ | २००/- |
| निहार | २००/- |
| पद्मगंधा | ४००/- |
| पुरूष स्पंदन | ३००/- |
| पुरूष उवाच | २००/- |
| प्रपंच | ३५०/- |
| पुढारी ✻ | ३००/- |
| ऋतुरंग | ३००/- |
| रागिणी | २५०/- |
| साधना | २००/- |
| केसरी | १५०/- |
| सत्याग्रही | २००/- |
| संस्कृती | ३००/- |
| मुक्त शब्द | ३५०/- |
| अक्षरलीपी | २५०/- |
| एकमेव वेगळा | २५०/- |
| अक्षर मुद्रा | २५०/- |
| अनुराधा | ३००/- |
| अलका | २७०/- |
| अनुराग | २७०/- |
| गृहलक्ष्मी | ३२०/- |
| गृहशोभिका ✻ | ९०/- |
| माहेर | ३५०/- |
| मानिनी | ३५०/- |
| मिळून साऱ्याजणी | १००/- |
| दीर्घ कथा | २००/- |
| श्री व सौ | २००/- |
| सुवासिनी | ३००/- |
| विपुलश्री | ३५०/- |
| वसुधा | २७०/- |
| सासर माहेर | २५०/- |
| गृहशोभा | १५०/- |

| | |
|---|---|
| शिवतेज | १००/- |
| शिवस्पर्श | १००/- |
| साप्ताहिक सकाळ✻ | २००/- |
| सामना ✻ | १५०/- |
| साहित्य शिवार | २००/- |
| साहित्य लोभस | १५०/- |
| संयम | १८०/- |
| उत्तम अनुवाद | ४००/- |
| वाघुर | ३५०/- |
| वसंत | ३००/- |
| वेदांतश्री | ३००/- |
| जडण घडण | २५०/- |
| चौफेर साक्षीदार | २५०/- |
| साहित्यरंजन | २५०/- |
| पद्मरत्न | ४००/- |
| मनोकल्प | ३००/- |
| साहित्य स्वानंद | १५०/- |
| मैत्र | ३००/- |
| मेहता मराठी ग्रंथ जगत | १५०/- |
| समदा | १८०/- |
| वसा | ३५०/- |
| सकाळ मनी ✻ | १५०/- |
| एकता | २५०/- |
| अक्षर वेध | ३९५/- |
| रत्नावली | २५०/- |
| लयभारी | ३५०/- |
| अक्षरधन | २४०/- |
| सृजन संवाद | ३५०/- |
| समिधा | २००/- |
| इन साईट | २५०/- |
| ब्रह्मज्ञान | २००/- |
| भविष्य | १५०/- |
| भविष्य निर्णय | २००/- |
| धनुर्धारी | ३००/- |
| ग्रहांकित | ४००/- |
| गृहबोली | २८०/- |
| ग्रहसंकेत | २००/- |
| ज्योतिष ज्ञान | ३५०/- |
| ज्योतिष तंत्र आणि मंत्र | ३००/- |
| मंत्र तंत्र तोडगे | २५०/- |
| वार्षिक राशी भविष्य | २५०/- |
| ग्रहवेध | २५०/- |
| रेकी | २००/- |
| आनंदी वास्तू तोडगे | २२०/- |

| | |
|---|---|
| आपले छंद | ४००/- |
| अर्थवेध | ३००/- |
| चपराक | ४००/- |
| ग्राहकहित | २५०/- |
| अपेक्षा | २००/- |
| मन:शक्ती | २००/- |
| पुणे प्रतिष्ठान | २००/- |
| नरवीर | १५०/- |
| संगम | २००/- |
| हेमांगी | ३००/- |
| पुण्यभुषण | ३००/- |
| पुणे पोस्ट | १२०/- |
| ऊंसमळा | ४०/- |
| फुल टाईम पास | १००/- |
| फुल मनोरंजन | १००/- |
| उल्हास प्रभात | १००/- |
| समाज प्रतिबिंब | ३००/- |
| मिडिया वॉच | ३००/- |
| गोंदण | १५०/- |
| थिंक पॉझीटीव्ह | २५०/- |
| ॲग्रोवन✻ | २००/- |
| संवाद सेतू | २५०/- |
| शुभम | ३००/- |
| भवताल | ३००/- |
| आंतर भारती | ३००/- |
| कोकण मिडीया | २००/- |
| वास्तव | ३००/- |
| परन्तु | २००/- |
| प्रफुल्ल टाईमपास | १५०/- |
| फिल्मी बोलबाला | १५०/- |
| क्रांतीवीर | २००/- |
| समाजसुधारक | २००/- |
| शोध विज्ञानाचा | २००/- |
| बिईंग वुमन | २५०/- |
| आचार्य अत्रे | २५०/- |
| सँडवीच | २५०/- |
| अर्थकारण | २५०/- |
| खट्टामिटा | २२५/- |

सर्व रसिक-वाचकांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

शब्दालय **पुस्तकवारी**
पुस्तकांची वारी... आपल्या दारी...

वरील व इतर दिवाळी अंक घरपोहोच मागविण्यासाठी खालील नंबरवर संपर्क करा...
**90 11 20 1414**

# ३३ जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या खात्यात नुकसान भरपाई देणार

## सर्व जिल्ह्यांचे पंचनामे अहवाल सादर । ५२ लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान

**सोलापूर :** राज्यातील ३३ जिल्ह्यांना सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टीचा तडाखा बसला. अतिवृष्टी व महापुरामुळे एकाच महिन्यात तब्बल ५२ लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले. सर्व जिल्ह्यांचे पंचनामे अहवाल शासनाला सादर झाले असून कृषी विभागाकडूनही एकूण अहवाल रात्री उशिरा राज्य सरकारला सादर करण्यात आला आहे. त्यामुळे आजपासून (ता. १८) शेतकऱ्यांच्या खात्यात भरपाईची रक्कम वितरीत होईल, असे कृषी विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

बीड, धाराशिव, सोलापूर, अहिल्यानगर, बुलडाणा, हिंगोली, परभणी, अमरावती, जळगाव, छत्रपती संभाजी नगर अशा ३३ जिल्ह्यांना सप्टेंबरमध्ये अतिवृष्टीचा सर्वाधिक फटका बसला. बीड, सोलापूर, अहिल्यानगर, धाराशिवला पुराचा फटका बसला. त्यामुळे शेतकऱ्यांची उरलीसुरली आशा पाण्यात वाहून गेली. दिवाळीपूर्वी बाधित शेतकऱ्यांच्या खात्यात भरपाई जमा होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सर्व मंत्र्यांनी सांगितले. पण, अजूनही २० पेक्षा अधिक जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना दमडीही मिळालेली नाही. शुक्रवारी वसुबारसने दिवाळीची सुरवात झाली असून शनिवारी धनत्रयोदशी आहे.

अतिवृष्टी, पुरामुळे बाधितांची दिवाळी आनंदात जावी, यासाठी धनत्रयोदशीच्या मुहुर्तावर भरपाईची रक्कम बाधित शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. शुक्रवारी रात्री उशिरापर्यंत कृषी व मदत व पुनर्वसन विभागातील अधिकाऱ्यांचे काम सुरू होते. नजर अंदाज अहवाल आणि पंचनामे अंतिम झाल्यानंतरचे एकूण बाधित क्षेत्र, याचा अहवाल कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी राज्य सरकारला पाठविला. आता दोन हेक्टरपर्यंतची मदत 'एनडीआरएफ' मधून तर वाढीव एक हेक्टरची मदत राज्य सरकार 'एसडीआरएफ'मधून देणार आहे.

### शासनाकडून लवकरच मिळेल मदत

राज्य सरकारला अतिवृष्टी व महापुरामुळे नुकसान झाल्याचा अहवाल पाठविण्यात आला आहे. त्यात दोन हेक्टर व दोन हेक्टरवरील बाधित शेतकऱ्यांची माहिती स्वतंत्र देण्यात आली आहे. दोन हेक्टरपर्यंतची मदत केंद्राकडून तर त्यावरील मदत राज्य शासनाकडून मिळणार आहे.

**- शुक्राचार्य भोसले, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, सोलापूर**



# शेतकऱ्यांना विदेश दौऱ्यासाठी २ लाख रुपये अनुदान

**मुंबई :** जगातील सर्वोत्तम शेती तंत्रज्ञान शेतकऱ्यांनी आपल्या शेतात वापरावे यासाठी परदेशी अभ्यास दौऱ्याचे कृषी विभागामार्फत आयोजन केले जाते. २०१२ नंतरच्या काळात प्रवास, निवास आणि परकीय चलनातील दरवाढ लक्षात घेता, विद्यमान १ लाख रुपयांच्या मर्यादित शेतकऱ्यांना पुरेशी मदत मिळत नव्हती. त्यामुळे अनुदान मर्यादा दुप्पट करून २ लाख रुपये करण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. हा निर्णय म्हणजे शेतीला अत्याधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्याचा प्रयत्न आहे. अशी प्रतिक्रिया कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

राज्यातील शेतकऱ्यांना जागतिक स्तरावरील प्रगत कृषी तंत्रज्ञान, प्रक्रिया उद्योग, बाजारपेठ विस्तार आणि उत्पादनवाढीच्या नवीन पद्धतींचे प्रत्यक्ष ज्ञान मिळावे यासाठी राबविण्यात येणाऱ्या राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेर अभ्यास दौर या योजनेत मोठा बदल करण्यात आला आहे. राज्य शासनाने या योजनेअंतर्गत प्रति शेतकरी दिल्या जाणाऱ्या अनुदानाची कमाल मर्यादा १ लाखांवरून बाढवून २ लाख इतकी करण्यास मान्यता दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय कृषी विभागाकडून जारी करण्यात आला आहे. राज्यातील शेतकरी या योजनेअंतर्गत आतापर्यंत अमेरिका, इस्त्रायल, जपान, ऑस्ट्रेलिया, नेदरलँड्स, फ्रान्स, थायलंड इत्यादी देशांतील शेतीतील नवकल्पना, सिंचन



तंत्र, पिक उत्पादन व्यवस्थापन, कृषी प्रक्रिया उद्योग, मूल्यवर्धन आणि निर्यातक्षम शेतीपद्धती यांचा अभ्यास करून आलेले आहेत.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या निर्णयाम ळे आता देशाबाहेर अभ्यास दौऱ्यासाठी जाणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रवास खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल रु. २ लाखांपर्यंत अनुदान देण्यात येईल. त्यामुळे शेतकऱ्यांना अधिक गुणवत्तापूर्ण अनुभव घेता येईल तसेच प्रगत देशांतील शेतीपद्धतींचा अभ्यास करून त्या आपल्या शेतीत राबविण्याची प्रेरणा मिळेल. भरणे पुढे म्हणाले, ही योजना सन २००४-०५ पासून कृषी विभागामार्फत राबविण्यात येत आहे. शेतकऱ्यांना विदेशात जाऊन तेथील आधुनिक तंत्रज्ञान, शेतीतील यशस्वी मॉडेल्स आणि बाजारपेठीय पद्धतींचा अभ्यास करता यावा, यासाठी या निर्णयाची अंमलबजावणी कृषी आयुक्तालय, पुणे यांच्या माध्यमातून करण्यात येईल. योजनेअंतर्गत निवड प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी अर्जाची छाननी जिल्हा कृषी अधिकारी, राज्यस्तरीय समित्या आणि कृषी आयुक्त कार्यालयाच्या माध्यमातून केली जाईल.

### अभ्यास दौऱ्यांतून शेतकऱ्यांना अपेक्षित फायदे

- ❋ अत्याधुनिक यांत्रिकी शेती
- ❋ ठिबक सिंचन आणि जलव्यवस्थापन
- ❋ जैविक शेती
- ❋ कृषी उत्पादन प्रक्रिया व मूल्यवर्धन
- ❋ कृषी निर्यात आणि विपणन या क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय अनुभव मिळणार
- ❋ शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात बचत
- ❋ अधिक उत्पादन आणि दर्जेदार पिकांसाठी नवीन बाजारपेठा.

# पाकिस्तानी भूभागाचा प्रत्येक इंच ब्राह्मोसच्या आवाक्यात



**नवी दिल्ली :** जम्मू काश्मीर मधील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तानला चांगलाच धडा शिकवला. मात्र, त्यानंतर अद्यापही पाकिस्तानकडून भारताविरोधात गरळ ओकण्याचं काम सुरूच आहे. भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी पाकिस्ताला मोठा इशारा दिला आहे. 'ऑपरेशन सिंदूर फक्त एक ट्रेलर होता, पाकिस्तानच्या जमिनीचा प्रत्येक इंच भाग आमच्या ब्रह्मोस क्षेपणास्त्राच्या कक्षेत आहे', असं राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. या संदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे.

भारताला खात्री आहे की आपले शत्रू आता ब्राह्मोसपासून सुटू शकणार नाहीत. पाकिस्तानी भूभागाचा प्रत्येक इंच आता आपल्या ब्राह्मोसच्या आवाक्यात आहे. ऑपरेशन सिंदूर हे भारताच्या क्षमतेची फक्त एक झलक होती. ऑपरेशन सिंदूरमध्ये जे घडलं ते फक्त एक ट्रेलर होता.

# आयपीएलचा लिलाव पुन्हा एकदा परदेशात?

**मुंबई :** आयपीएलचा लिलाव पुन्हा एकदा परदेशात होणार आहे. २०२६ च्या हंगामासाठीचा हा लघु-लिलाव १५ ते १८ डिसेंबर दरम्यान दुबई, मस्कत किंवा दोहा यापैकी एका ठिकाणी होणार आहे, असे बीसीसीआयच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर दैनिक भास्करला सांगितले.

गेल्या आठवड्यात काही माध्यमांनी असा दावा केला होता की यावर्षीचा लिलाव भारतातील एका शहरात होणार आहे. गेल्या वर्षी, २०२४ मध्ये, आयपीएलचा मेगा लिलाव सौदी अरेबियातील जेद्दाह येथे झाला होता. तरीही, भारतात स्थळांचा अभाव आणि लॉजिस्टिक आव्हाने ही कारणे म्हणून उद्धृत करण्यात आली होती.

यावेळी लिलावासाठी दुबई, मस्कत आणि दोहा ही नावे चर्चेत आहेत. दुबईला सर्वात प्रबळ दावेदार मानले जाते, कारण ते केवळ बीसीसीआय आणि आयपीएल फ्रँचायझींसाठी उत्कृष्ट पायाभूत सुविधा प्रदान करत नाही तर गेल्या काही वर्षांत तेथे अनेक यशस्वी कार्यक्रमांचे आयोजन देखील केले आहे.

२०१४ मध्ये, जेव्हा भारतातील सार्वत्रिक निवडणुकांमुळे सुरुवातीचे आयपीएल सामने परदेशात हलवण्यात आले तेव्हा युएईची निवड करण्यात आली. २०२० आणि २०२१ मध्ये, कोविड-१९ साथीच्या काळातही संपूर्ण आयपीएल युएईमध्ये आयोजित करण्यात आला होता. मस्कत (ओमान) हा पर्याय म्हणून देखील विचारात घेतला जात आहे, कारण बीसीसीआयचे तेथे चांगले संबंध आहेत आणि एक लहान पण आधुनिक क्रिकेट संकुल आहे.

# महापालिकेतील कंत्राटी कामगारांना कायम नियुक्तीचा आदेश

**मुंबई :** मालेगाव महानगरपालिकेतील कंत्राटी पद्धतीने कार्यरत असलेल्या चार कामगारांना बॉम्बे उच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. नगरपालिकेने सेवेतून काढून टाकलेल्या या चालक आणि अग्निशमन कर्मचाऱ्यांना न्यायालयाने तत्काळ पुनर्नियुक्त करण्याचे व कायम नियुक्तीचा दर्जा देण्याचे आदेश दिले आहेत.

या निर्णयामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या हजारो कर्मचाऱ्यांना नवा दिलासा मिळाला असून, हा निकाल कंत्राटी कामगारांच्या हक्कांसाठी मैलाचा दगड ठरतो आहे. मालेगाव महापालिकेतील कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या चालक आणि अग्निशमन विभागातील चार कामगारांना अनेक वर्ष महापालिकेच्या सेवेत सातत्याने काम करूनही कायम नियुक्ती न मिळालेल्या या कामगारांना सेवेतून काढून टाकल्यावर त्यांनी न्यायालयात धाव घेतली होती. या प्रकरणात निर्णय देताना उच्च न्यायालयाने स्पष्ट आदेश दिला की, कामावरून काढलेली कारवाई बेकायदेशीर असून या सर्व कामगारांना तात्काळ पुन्हा उच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय मालेगाव दर्जा दिला जावा. सेवेत घेण्यात यावे आणि त्यांना कायम नियुक्तीचा कामगारांनी २०१६१७ पासून सातत्याने सेवा दिली असूनही महापालिकेने त्यांना केवळ तात्पुरते कर्मचारी म्हणूनच ठेवले, में २०२५ मध्ये त्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता सेवेतून काढण्यात आले.

यानंतर त्यांनी इंडस्ट्रियल कोर्टात व नंतर उच्च न्यायालयात आपला अन्याय माडला. न्यायालयाने हे स्पष्ट केले की, आवश्यक व महत्त्वाच्या सेवांसाठी नेमले गेलेले कर्मचारी तात्पुरते कसे राहू शकतात? सततची सेवा हेच त्यांचे हक्क दर्शवते आणि प्रशासनाने त्यांना कायम का केले नाही, याचे समाधानकारक उत्तर नाही. महापालिकेने आर्थिक अडचणी आणि पदनिर्मिती नसल्याचे कारण पुढे केले, पण न्यायालयाने हे कारण फेटाळले. काम आहे, सेवा आहे. तर पद नाकारणे हे अन्यायकारक असल्याचे न्यायालयाने ठणकावून सांगितले. न्यायालयाने हा प्रकार म्हणजे श्रमिक शोषण आणि प्रशासनाकडून दुर्लक्ष असल्याचे ठरवले. या निर्णयामुळे केवळ मालेगाव नव्हे, तर राज्यभरातील कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या कामगारांमध्ये आशेचा किरण निर्माण झाला आहे. ही केवळ चार जणांची लढाई नव्हती, तर संपूर्ण कंत्राटी कामगार वर्गासाठीचा निर्णायक क्षण आहे, अशी भावना राज्यातील कामगार संघटनांनी व्यक्त केली आहे. उच्च न्यायालयाच्या या ऐतिहासिक निर्णयामुळे प्रशासनाला स्पष्ट संदेश गेला आहे श्रमाचा सन्मान करा, शोषण थांबवा.

पान १ वरून

## 'राधाकृष्ण विखे पाटलांना सोडणार नाही'

अवघ्या १० तासांत कुणबी प्रमाणपत्र जारी

छगन भुजबळ यांनी यावेळी २ सप्टेंबरच्या जीआरनंतर मराठा समाजातील लोकांना अवघ्या १० तासांतच कुणबी प्रमाणपत्र जारी केले जात असल्याचाही आरोप केला. ते म्हणाले, एक कुणबी प्रमाणपत्र अवघ्या १० तासांतच जारी करण्यात आले. या प्रकरणी १६-१७ गोष्टी पडताळून पाहायच्या आहेत. पण अधिकारी काहीच पाहत नाहीत. ते ज्याला पाहिजे, त्याला दिले जात आहे. हा काय प्रकार आहे? हा सर्व प्रकार नव्या जीआरमुळे होत आहे. या जीआरमुळे अधिकाऱ्यांना हे सर्वकाही फ्री झाल्याचे वाटत आहे. कुणी येतो व मी कुणबी असल्याचे सांगतो. त्याला सर्रासपणे प्रमाणपत्र दिले जात आहे.

इतर आदिवासी, दलित व ओबीसी समाजाला हे प्रमाणपत्र काढण्यासाठी १०-१० महिने लागतात. त्यांना आपली जात सिद्ध करण्यासाठी ५० वर्षांपूर्वीचे प्रमाणपत्र आणण्यास सांगितले जाते. पण इथे अवघ्या १० प्रमाणपत्र जारी केले जाते. हे सर्वकाही सरकारच्या नव्या जीआरमुळे होत आहे. प्रशासनातील अधिकारी प्रचंड दबावात आहेत, असे ते म्हणाले.

विजय वडेट्टीवार यांच्यावरही साधला निशाणा

छगन भुजबळांनी यावेळी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांच्यावरही निशाणा साधला. मनोज जरांगेंच्या लोकांनी मागे बीड पेटवले. मी गेलो व सांगितले की, मी इथे तोंड उघडणार. मी तेव्हा मंत्रिमंडळाचा राजीनामाही देऊन आलो होतो. त्या बैठकीत वडेट्टीवारांसह सर्वच मंडळी होती.

अतिशय जोरात ते बोलले. ते म्हणाले भुजबळ साहेब पक्ष वगैरे बाजुला राहूद्या, हा पिवळा झेंडा घेऊन आपण सर्वजण पुढे जाऊया आणि या ओबीसीला न्याय मिळवून देऊया. आम्हाला आनंद झाला. एखाद्या पक्षाचा नेता ओबीसींसाठी उत्साहाने भांडत असेल, तर मला आनंद होणे स्वाभाविकच आहे. त्यानंतर बाकीच्या सभा झाल्या. मग त्यांनी भूमिका बदलली, म्हणून मी त्यांना बोललो, असे ते म्हणाले.

## शिवाजी पार्कवर ठाकरे बंधू पुन्हा एकत्र!

त्यामुळं राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे. राजकारणामध्ये दोन्ही ठाकरे बंधू एकत्र येणार का? अशी देखील चर्चा सुरु आहे.

शिवाजी पार्कवर आज उद्धव ठाकरे यांच्या हस्ते महाराष्ट्र नवनिर्माणसेनेच्या दिपोत्सवाचे उद्घाटन

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या दिपोत्सवानिमित्त आज राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र आले होते. शिवाजी पार्कवर आज उद्धव ठाकरे यांच्या हस्ते महाराष्ट्र नवनिर्माणसेनेच्या दिपोत्सवाचे उद्घाटन झाले. यावेळी राज ठाकरे यांचे संपूर्ण कुटुंबीय आणि उद्धव ठाकरे यांचे सर्व कुटुंबिय उपस्थित होते. यावेळी उद्धव ठाकरेंनी समोर उपस्थित असलेल्या सर्वांना मार्गदर्शन केलं. सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. मराठी माणसांची एकजूट आणि त्या एकजूटीचा प्रकाश सर्वांच्या आयुष्यात आनंद घेऊन आल्याशिवाय राहणार नाही असे उद्धव ठाकरे म्हणाले.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या पक्षाकडून दरवर्षी दिवाळी निमित्त दादरच्या शिवाजी पार्क मैदानात दीपोत्सवाचे आयोजन

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या पक्षाकडून दरवर्षी दिवाळी निमित्त दादरच्या शिवाजी पार्क मैदानात दीपोत्सवाचे आयोजन केलं जातं. यावर्षीदेखील राज ठाकरे यांच्याकडून दीपोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. या कार्यक्रमाचं प्रमुख आकर्षण हे वेगळं आहे. कारण या कार्यक्रमाचं उद्घाटन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आलं आहे. या कार्यक्रमाची पत्रिका जाहीर झाली तेव्हाच अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला होता. विशेष म्हणजे कार्यक्रमाच्या पत्रिकेवर उद्धव ठाकरे यांचा शिवसेनाप्रमुख असा उल्लेख बघायला मिळाला. त्यामुळे या दीपोत्सवाच्या उद्घाटन कार्यक्रमात दिवाळीनिमत्त चांगलेच राजकीय फटाके फुटणार अशा चर्चांना उधाण आलं. अखेर आज हा कार्यक्रम संपन्न होत आहे. विशेष म्हणजे राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकाच गाडीतून शिवतीर्थवर दाखल झाले. यावेळी राज ठाकरे यांनी ड्रायव्हिंग केल्याचं चित्र पाहायला मिळालं.

## पाकिस्तानच्या हल्ल्यात अफगाणिस्तानचे तीन क्रिकेटपटू ठार

निर्णयामुळे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये अगोदरच वाळीत पडलेल्या पाकिस्तानी क्रिकेट बोर्डाची चांगलीच गोची होणार आहे. काही दिवसांपूर्वी पाकिस्तानी क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष मोहसीन नक्वी यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेट संघटनेला एक पत्र लिहले होते. यामध्ये त्यांनी म्हटले होते की, अफगाणिस्तानने तिरंगी स्पर्धेतून माघार घेतली तर पर्यायी योजना तयार ठेवावी. मात्र, तीन उदयोन्मुख क्रिकेटपटूंचा पाकिस्तानच्या भ्याड हल्ल्यात मृत्यू झाल्यानंतर अफगाणिस्तानने या तिरंगी क्रिकेट स्पर्धेतून माघार घेतली. त्यामुळे आता ही मालिकाच रद्द होऊ शकते. तसे झाल्यास पाकिस्तानी क्रिकेट बोर्डाला आर्थिक नुकसान सहन करावे लागू शकते. यावर आता पाकिस्तान काय प्रतिक्रिया देणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

# टाटा सन्सची धुरा चंद्रशेखरन यांच्याच हाती

**मुंबई :** टाटा सन्सच्या अध्यक्षपदी एन. चंद्रशेखरन हेच कायम राहणार असून, या पदावरील त्यांच्या तिसऱ्या कार्यकाळास टाटा ट्रस्टने मंजुरी दिल्याचे समजते. टाटा समूहात निवृत्तीची ६५ वर्षांची वयोमर्यादा असतानाही चंद्रशेखरन यांची निवड करण्यात आली आहे.

टाटा सन्सच्या अध्यक्षपदाचा चंद्रशेखरन यांचा दुसरा कार्यकाळ फेब्रुवारी २०२७ मध्ये संपत आहे. त्यावेळी ते वयाची ६५ वर्षे पूर्ण करतील, टाटा समूहाच्या निवृत्तीच्या धोरणानुसार, वरिष्ठ पदावरील अधिकाऱ्याने ६५ व्या वर्षी निवृत्त होणे अपेक्षित आहे. याचवेळी बिगर ही कार्यकारी भूमिकेतील अधिकाऱ्यासाठी वयोमर्यादा ७० वर्षे आहे. मात्र चंद्रशेखरन या नियमाला अपवाद ठरतील, अशी शक्यता आहे.

चंद्रशेखरनयांना वयाची ६५ वर्षे उलटल्यानंतरही, अधिकचा कार्यकाळ बहाल करण्याच्या निर्णयामागे समूहाच्या कामकाजात सातत्य राखणे हा हेतू आहे. समूहाकडून सेमीकंडक्टर, इलेक्ट्रिक वाहनांसाठी बॅटरी निर्मिती यासह विमानोड्डाण क्षेत्रातील महत्त्वाकांक्षी एअर इंडियाचा कायापालट हे महत्वाचे प्रकल्प सुरू आहेत. या प्रकल्पांच्या यशासाठी चंद्रशेखरन यांच्या नेतृत्वाची आवश्यकता आहे. टाटा ट्रस्टने चंद्रशेखरन यांच्या निवडीचा ठराव टाटा सन्सला पाठविला आहे. टाटा सन्सच्या संचालक मंडळाकडून चंद्रशेखरन यांच्या तिसऱ्या कार्यकाळास मंजुरी देताना या ठरावाचा विचार करावा लागेल, असेही सूत्रांनी म्हटल्याचे वृत्तात नमूद करण्यात आले आहे.

| | | |
|---|---|---|
| चिमण्या चिवचिवल्या | - मा.रा.लामखडे | रु. १०० |
| टिकली तर टिकली | - श्रद्धा बेलसरे | रु. १५० |
| रानसय | - भास्कर चंदनशीव | रु. २२५ |
| निःशब्द कोलाहल | - धनंजय गोवर्धने | रु. ११० |
| आधुनिक मराठी गेय कविता | - डॉ.सयाजीराजे मोकाशी | रु. १७५ |
| मुके जाते गाणे गाते | - विनायक बंगाळ | रु. ९० |
| कानडी मुलखातील मुशाफिरी (प्रवास वर्णन) | - मा.रा.लामखडे | रु. २२० |
| पैंजणांचे झाड | - सिसिलिया कार्व्हालो | रु. १५० |
| काळोखाला दूर सारून | - प्रतिभा जाधव | रु. १४० |
| साळुंकीची सावली | - महावीर जोंधळे | रु. १८० |
| उत्कर्षवाटा (पुणे विद्यापीठ) | - संपा.डॉ.लांडगे, डॉ.रोंगटे, डॉ.सांगळे | रु. १२० |
| रंग जीवनाचे | - बबन काकडे | रु. २५० |
| च्यामारी | - डॉ.प्रमोद काळे | रु. १८० |
| कुब्र | - सत्यजित पाटील | रु. २३० |
| **नाटक/एकांकिका/चित्रपट विषयक** | | |
| तुंबारा | - सयाजी शिंदे | रु. २५० |
| तृतीय रत्न (नाटक) (जळगाव विद्या. अभ्यासक्रमात समाविष्ट) | - ले.जोतिराव फुले, संपा. दत्ता भगत | रु. २२५ |
| माझं घर | - जयंत पवार | रु. १६० |
| जनक | - शार्दुल सराफ | रु. १५० |
| हंडाभर चांदण्या (संहिता आणि लेख) (पुणे विद्यापीठ) | - दत्ता पाटील/ संपा.सतिश बडवे | रु. १५० |
| राहिले दूर घर माझे | - शफाअत खान | रु. १४० |
| चौक | - मकरंद साठे | रु. १२० |
| मंथरक आणि इतर एकांकिका | - जयसिंग पाटील | रु. ९० |
| जाता नाही जात | - सिद्धार्थ तांबे | रु. १५० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| प्रत्ययकारी परदेशी सिनेमा | - उदय कुलकर्णी | रु. ६५० |
| **चरित्र/आत्मचरित्र** | | |
| श्री.संत चोखामेळा : चरित्र आणि अभंग | - संपा.स.भा.कदम, प्रस्ता.भालचंद्र नेमाडे | रु. १६० |
| जिजी (शेतकरी आईची जीवनगाथा) | - प्रा.सौ.लिला जंजिरे | रु. २०० |
| कोकरूड ते बर्मिंगहॅम | - प्रा.अब्दुलगनी अत्तार | रु. ३७५ |
| सुंबरान | - दिनकर यमनाजी शेलार | रु. २५० |
| पंख गळून गेले तरी | - सुधीर देवरे | रु. ८० |
| स्त्रीरत्न क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चोले | रु. ७५ |
| मलिक अंबर | - वि.स.वाकसकर | रु. १०० |
| लावणी सम्राज्ञी (यमुनाबाई वाईकर यांचे चरित्र) | - प्रभाकर ओव्हाळ | रु. २५० |
| कांताबाई सातारकर | - संतोष खेडलेकर | रु. २०० |
| स्वातंत्र्यसूर्य महाराणा प्रताप | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| संत मीराबाई | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| मी तो हमाल | - आप्पा कोरपे | रु. १५० |
| प्रकाशाची बेटे | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २२० |
| **कविता संग्रह** | | |
| बालकवींच्या निवडक कविता | - संपा.ना.धों.महानार | रु. ११५ |
| वसा | - वसंत सावंत | रु. ७५ |
| सुमती लांडे : समग्र कविता | - संपादक : कविता मुरुमकर/ सुमती लांडे | रु. ५९९ |
| कमळकाचा | - सुमती लांडे, चित्रप्रत्यय- प्रभाकर कोलते | रु. २०० |
| वाहते अंतर | - सुमती लांडे | रु. ९० |
| तुकाराम : अहिराणीत निरुपण | - डॉ.एस.के.पाटील | रु. ५२५ |
| बोलावे ते आम्ही (साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त) | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| येरू म्हणे | - प्रवीण बांदेकर | रु. १०० |
| बोलावे ते आम्ही | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| ऋतुपर्णाच्या कविता | - जितेंद्र कुंवर | रु. ३०० |
| आवानओल | - अजय कांडर | रु. १०० |
| प्रलयानंतरची तळटीप | - सुचिता खल्लाळ | रु. २२५ |
| दंडविधान | - मनोज सुरेंद्र पाठक | रु. २७० |
| एक शून्य प्रतिक्रिया | - व्यंकटेश चौधरी | रु. २०० |
| माणूस उकरून काढावा लागतोय | - सिसिलिया कार्व्हालो | रु. २०० |
| ज्याचा त्याचा चांदवा | - अंजली ढमाळ | रु. २२० |
